


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २४१, मंगळवार ११ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# थांबलो असतो तर माझे राजकारण संपले असते!

## ■ खा. नीलेश लंके यांनी उलगडला लोकसभा निवडणूकीचा घटनाक्रम ■ एबीपी माझाच्या कट्टयावर लंके यांची दिलखुलास मुलाखत

पारनेर : प्रतिनिधी

**लोकसभा निवडणूक लढविण्याचा शब्द पवार साहेबांना दिला होता. हा निर्णय मी अजितदादांना सांगितल्यानंतर दादांनी सर्वेक्षण निगेटिव्ह असल्याचे सांगितले. परंतू माझा निर्णय झालेला होता. पालकमंत्री राधाकृष्ण विखे व माझे इतके फाटले होते की जर लोकसभा निवडणूकीत मी थांबलो असतो तर माझे राजकारण संपले असते अशा भावना नवनिर्वाचित खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केल्या.**

या मुलाखतीदरम्यान बोलताना लंके म्हणाले, शरद पवार यांच्यासोबत जाणार असल्याचे अजित पवार यांना सांगण्याचा प्रयत्न केला. विखे व माझे पटत नाही हे अजित पवार यांनाही माहीती होते. मी निर्णयावर आलो त्यावेळी अजित पवार म्हणाले तु लढणार की पत्नी ? मी पत्नीचा विचार करू असे सांगितल्यावर अजित पवार यांनी मी सर्वेक्षण करतो असे सांगत मीच महायुतीसाठी जागा मागतो. मात्र त्यांच्या सर्वेक्षणात मी निगेटिव्ह आलो. दादांना माझ्यामुळे त्रास झाला मी त्यांची माफी मागणार आहे. माझे आणि विखे यांचे इतके फाटले होते की मी जर या निवडणूकीत थांबलो असतो तर मी संपलो असतो.



### विरोधकांनीच मला उमेदवार केले

माझी चर्चा सुरू झाल्यानंतर माझ्यावर आरोप, टीका टिपन्नी सुरू झाली. त्यानंतर जनतेनेही मला डोक्यावर घेतले. विरोधकांनीच मला लोकसभेचा उमेदवार केले. वातावरण निर्मितीनंतर पक्षाच्या नेतृत्वानेही चाचपणी करण्यास सुरूवात केली. समोरच्या कुटूंबाला नीलेश लंके हाच काउंटर करू शकतो ही गोष्टही नेतृत्वाच्या लक्षात आली. हा मतदारसंघ राष्ट्रवादीकडे नव्हता.

### मी लोकसभा लढणार असल्याच्या चर्चा सुरू झाली

मी जिल्हाभर फिरत होतो. मला मित्र जोडण्याचा प्रयत्न करतो. प्रत्येकाच्या सुख दुःखात सहभागी होण्याचा प्रयत्न करतो. त्यातून लोकसंग्रह वाढला. त्यातूनच मी लोकसभेचा उमेदवार म्हणून चर्चा सुरू झाली. विधानसभेनंतर माझ्या डोक्यात कधीही लोकसभेची निवडणूक नव्हती. राज्यात काम करण्यात मला आवड होती. साडेचार वर्षात मतदार संघात मी मोठी कामे केली. कामाचा ठसा उमटविता आला.

### राजकारणात सर्व गोष्टी अपघातने झाल्या

राजकारणात मी बऱ्याच गोष्टी अनुभवल्या. कोणत्याही गोष्टी ठरवून होत नाहीत. माझा राजकीय प्रवास पाहिला तर सर्व राजकीय गोष्टी अपघातने होत गेल्या. सरपंच, पंचायत समिती, उपसभापती, जिल्हा परीषद, विधानसभा या सर्व घटना माझ्यासाठी धक्कादायक होत्या. जनतेने जे प्रेम केले त्या प्रेमातून उतराई होण्यासाठी त्यांच्यासाठी राजकीय ताकदीचा, सत्तेचा उपयोग व्हावा यासाठी आमदार असताना काम केले.

### इच्छाशक्तीच्या जोरावर पुढे गेलो

सर्व काही नशिबाने मिळत नाही. त्यामागील संघर्ष पाहिला तर सामान्य माणूस त्यात पडणार नाही. ज्यांच्या पिढयान पिढया राजकारणात आहेत त्या कुटूंबाला राजकारण, निवडणूका सोप्या जातात. आपल्यासारख्याला ते फार कठीण जाते. राजकीय वारसा, आर्थिक सक्षमता नसेल तर राजकारण अवघड आहे. अनेकदा माझ्याकडे डिझेललाही पैसे नसत. मात्र मी संघर्ष करत गेलो. इच्छाशक्तीच्या जोरावर मी पुढे गेलो.

### आम्ही हिट लिस्टवर आलो

आम्ही आमच्या परिसरातील एमआयडीसीतील उद्योगांना संरक्षण दिले. त्यामुळे आम्ही हिट लिस्टवर आलो. त्यातून संघर्ष झाला. संघर्षाशिवाय दुसरा पर्याय आमच्यापुढे नव्हता.

### वडिलांच्या सेवानिवृत्तीच्या पैशांतून उधारी दिली

सन २००७ ला मी पंचायत समितीची निवडणूक लढविली. अर्ज दाखल केला त्यावेळी माझ्याकडे मोबाईलही नव्हता. एका मित्राने पाच हजार रूपयांची मदत केल्यानंतर गाडयांची काही भाडी दिली. पेट्रोल पंपावर उधारीवर डिझेल टाकले. त्या निवडणूकीत ३००-४०० मतांनी माझा पराभव झाला. त्यावेळी वडील नोकरीतून निवृत्त झाले होते.त्यांना मिळालेल्या पैशांतून निवडणूकीची उधारी दिली.

### निवडणूक कशी होऊन गेली समजलेही नाही

निवडणूक लढविण्यासाठी पैसा, राजकीय वारसा, परंपरा लागते असे बोलले जाते. हे आपणास मान्य नाही. तुमची इच्छाशक्ती प्रबळ पाहिजे, कर्म आणि भावना चांगली पाहिजे. समाजासाठी काम करण्याची धमक पहिजे. स्वार्थासाठी केले तर तुम्ही राजकारणात एकदा यशस्वी व्हाल, दुसऱ्यांदा लोक तुम्हाला घरचा रस्ता दाखवतील. माझी भावना चांगली होती त्यामुळे मला कधीही पैसा कमी पडला नाही. ही निवडणूक कशी होऊन गेली हे मलाही समजले नाही. लोक मदत करतात.

### माझ्यासाठी लोकसभा लढव

राजकारणात शब्दाला किंमत असते. शब्द पाळल्यावर लोक विश्वास ठेवतात. महायुती सत्तेत येण्यापूर्वी विखे परीवाराला लंके लढत देऊ शकतो हे लक्षात आल्यानंतर महाविकास आघाडी सरकार सत्तेत असताना अजितदादा पवार, जयंत पाटील यांनी लोकसभा निवडणूकीस सामोरे जावे लागेल अशी गळ घातली. मात्र आपण मला लोकसभेत रस नसून मला राज्यातच काम करण्याची आवड असल्याचे सांगितले होते. एकदा शरद पवार यांनी मला तसेच राजेंद्र फाळके यांनी बारामतीस बोलविले. त्यावेळीही मी नकार दिला होता. त्यावेळी पवार यांनी धनशक्ती विरूध्द जनशक्ती अशी ही निवडणूक करायची असल्याचे ते म्हणाले होते. तुम्ही म्हणाल तर आज आमदारकीचाही राजीनामा देतो असेही त्यांना म्हणालो. त्याच वेळी माझ्यासाठी आमदारकी सोडण्यासाठी तयार असशील तर माझ्यासाठीच लोकसभा लढव अशी गळ शरद पवार यांनी घातली होती असे लंके म्हणाले. शरद पवार यांनी भावनीक साद घातल्याने मी निवडणूक लढविण्यास होकार दिला होता. मात्र त्यानंतर मी हेतूतः संपर्क वाढविण्यास सुरूवात केली.

### दादांची ताकद दिली, साहेबांनी प्रेम दिले

विधानसभा निवडणूकीत अजित पवार यांनी मला बोलवून पक्षाची उमेदवारी दिली. पुढे दादा उपमुख्यमंत्री झाले. त्यांनी मला मोठया प्रमाणावर निधी दिला, ताकद दिली. त्याच बरोबर शरद पवार यांनी मला प्रेमही दिले. अगदी आई वडीलांनंतर मला पवार साहेबांनी प्रेम दिले. चार्टर प्लेनमध्ये मी कधी बसलो नाही त्यांनी मला सोबत घेउन चार्टरमधून प्रवास केला. हेलीकॉप्टरमध्ये त्यांनी मला बसविले. संसदेत त्यांनी मला नेले.

### मी कार्यकर्ते सक्षम केले

माझ्या बरोबर राहणे म्हणजे कार्यकर्त्यांच्या खिशाला झळ असते. आजही हीच स्थिती आहे. माझ्या नावामागे आमदार ही पदवी लागली आता खासदार लागली परंतू कार्यकर्त्यांना त्यासाठी आर्थिक झळ पोहचते. दोन रूपये घरी नेण्याची आम्हाला सवय नाही. कुछ पानेके लिए कुछ खोना पडता है. कारण मी समाजासाठी केले म्हणून लोकांनी मला डोक्यावर घेतले. माझ्या गाडीचे डिझेल कोण भरते ते मलाही कळत नाही. ज्याच्या नावावर गाडी तोच तीचे हप्ते भरतो. सगळी यंत्रणा अशीच चालते. अगदी माझा मोबाईल फुटला तरी एखादा कार्यकर्ता मोबाईल आणून देतो. मी माझ्या आयुष्यात काही केले नाही मात्र कार्यकर्ते मात्र सक्षम केले. त्यामुळे ते माझ्यासाठी खर्च करतात.

### अजितदादांचे नेतृत्व टिकले पाहिजे

राज्याच्या राजकारणात अजितदादांसारखे नेतृत्व टिकले पाहिजे. मनाला काय वेदना होताहेत, काय परिणामांना सामोरे जावे लागेल याचाही विचार केला. माझी आमदारकी असली काय किंवा नसली काय राज्याला त्याचा फरक पडणार नाही, परंतू अजितदादांसारखा नेता राज्याच्या राजकारणातून बाजूला पडला त्याचा परिणाम राज्याला भोगावा लागेल. त्याचा विचार केला व दादांच्या पाठीशी उभे राहिलो. मात्र एकीकडे वेदना होत्या. त्याच वेळी मी माझा राजीनामा लिहिला होता. मला दादा व साहेब यांना दुखवायचे नव्हते. साहेबांना आपल्याकडून दुःख होता कामा नये या भावना होत्या. ते माझ्या हृदयाला कायम स्पर्श करत होते.

### आणि विधानसभा लढविण्याचा निर्णय झाला !

मी जिल्हा परीषदेत निवडून आलो. त्यावेळी इतरांनी विजय औटी यांच्या कानाला काही राजकारणी लागले. मी औटी यांचा स्पर्धक असल्याचा त्यांचा समज करून दिला. त्यानंतर मला डावलले जाऊ लागले. मला नाकारले जाऊ लागले. कार्यक्रम पत्रिकेत माझे नाव टाळले जाऊ लागले. पुढे जिल्हा नियोजनची निवडणूक जाहिर झाली. आमदारांची शिफरस मिळण्याची शक्यता नव्हती. मात्र ही निवडणूक ताकदीने निवडणूक लढविली. आणि सर्वाधिक मतांनी मी या निवडणूकीत विजयी झालो. त्यानंतर औटी यांनी तडजोड करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मात्र आम्ही एका वेगळया उंचीवर होतो. दोन्ही निर्णय घेउ शकत होतो. त्यावेळी ३० कार्यकर्त्यांची देहू येथे बैठक बोलविली. औटींशी जुळवून घ्यायचे की पुढे जायचे याबाबत विचारणा केली. आमदार होण्याची संधी असल्याने निवडणूक लढविण्याची काहींनी गळ घातली तर काहींनी विरोध केला. त्यानंतर निवडणूक लढविण्याचा निर्णय झाला. तो निर्णय मात्र गुलदस्त्यात ठेवण्याचा निर्णय झाला.

### शिंदे, फडणवीस पाहून धक्का बसला

पुढे राज्यात महायुतीचे सरकार आले. त्यापूर्वी अजितदादांचा फोन आला. पूर्वनियोजित कार्यक्रम सोडून मी मुंबईत पोहचलो. अजितदादांकडे गेलो त्यावेळी पक्षातील मोठे नेते तिथे उपस्थित होते. तिथून गाडयांमध्ये बसून एका ठिकाणी गेल्यानंतर व्यासपीठावर एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस पाहिल्यावर धक्का बसला.

### पवार साहेबांना होकार दिला

पवार साहेबांना दिलेला शब्द पुर्ण केला तरच मनाच्या वेदना कमी होणार होत्या. अन्यथा मी शेवटच्या श्वासापर्यंत मी हे दुःख विसरू शकलो नसतो. लोकसभेच्या बैठका सुरू झाल्यानंतर पवार साहेबांचा निरोप आला. ठरल्याप्रमाणे शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीसाठी साहेबांनी त्यांचे त्या दिवशीचे सर्व कार्यक्रम स्थगित केले. प्रवेशद्वारावरही नीलेश लंके भेटीसाठी आले आहेत हे सांगायचे नाही हे सांगून ठेवण्यात आले होते. पवारांनी विचारणा केल्यावर मी दिलेला शब्द पाळणार असल्याचे त्यांना सांगितले. नागपूर अधिवेशनानंतर निर्णय घेऊ असे त्यावेळी निश्चित करण्यात आले.

### मी शरद पवारांमुळे खासदार

मी मुलाखतीला येताना मोठया साहेबांचे आशिर्वाद घेऊन आलो. माझ्या विजयाचा आनंद सर्वाधिक आनंद पवार साहेबांना झाला. मी आज खासदार म्हणून तुमच्यासमोर बसलो ते केवळ शरद पवार साहेबांमुळेच बसलो आहे. त्यांची काय क्रेझ आहे ते मतदारसंघात फिरल्यावर समजते.

### व्यासपीठावर जाऊन उध्दव साहेबांचे दर्शन घेतले

२०१८ मध्ये विजय औटी यांच्या वाढदिवसाला उध्दव ठाकरे हे पारनेर येथे आले होते. मी तालुकाप्रमुख या नात्याने या कार्यक्रमास आमंत्रीत करणे गरजेचे होते. उध्दव साहेब येणार म्हणून आम्ही जाणे गरजेचे होते. आम्ही २ ते ३ हजार कार्यकर्त्यांसह सभास्थळी पोहोचलो. मला व्यासपीठावर येऊ न देण्याची व्यवस्था करण्यात आली होती. तरीही मी थेट व्यासपीठावर जाऊन उध्दव साहेबांचे दर्शन घेतले.

### दगडफेकीच्या कारणातून माझी हकालपट्टी

पारनेर येथील सभा संपल्यानंतर उध्दव साहेबांचे अंगरक्षक बसलेल्या गाडीचे चाक मा. आ. अनिल राठोड यांच्या पायावरून गेले. त्यामुळे संतप्त कार्यकर्त्यांनी त्या गाडीवर दगडफेक केली. त्याच कारणातून माझी तालुकाप्रमुख व पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. पुढे रमेश थोरात यांच्या माध्यमातून मला अजित पवार यांनी दोन मिनिटात राष्ट्रवादीची उमेदवारी दिली.

### पवार हे व्यक्तीद्व्रोशातून राजकारण करत नाहीत

माझ्या विजयामुळे विखे-पवार संघर्षाचा वचपा निघाला असे म्हणणे योग्य नाही. शरद पवार हे व्यक्तीद्व्रोशातून राजकारण करणारे व्यक्तीमत्व नाही. शरद पवार हे राजकारणामध्ये प्रगल्भ विचार करणारे व्यक्तीमत्व आहे. त्यांच्याकडे देशाचे व्हिजन आहे. ८४ व्या वर्षी ते ५० ते १०० वर्षांचा विचार करणारे हे व्यक्तीमत्व आहे. असे व्यक्तीमत्व व्यक्तीव्देशातून कधी राजकारण करत नाही. मात्र माझ्यासारखा सर्वसामान्य उमेदवार विजयी झाला याचा त्यांना निश्चित आनंद आहे.

### शंभर जन्मात असे काम होणार नाही

देशात कोव्हिड महामारी आली त्या काळात जे काम केले त्यावेळी केलेले काम महत्वपूर्ण वाटते. असे काम मी शंभर जन्म घेतले तरी असे काम माझ्याकडून होणार नाही. मी आमदार होतो. ही पदे मिरविण्यासाठी नाहीत. मतदारसंघातील नागरिकांवर आलेल्या संकटात मदत करण्याची जबाबदारी माझी होती. आमचे कोव्हिड सेंटर प्रकाशझोतात आले. परंतू लॉकडाऊनच्या काळात आम्ही त्यापेक्षाही चारपट काम केले.

### माझ्यासमोर महासागर होता !

लोकसभा निवडणूकीत माझ्यापुढे महासागर होता. महासागरात पोहता येते का ? हिमालयास कोणी धडक देऊ शकतो का ? राजकारणातील बारकावे माहीती असल्याने मी या लढाईत उतरू शकलो. मला राजकीय पार्श्वभुमीही नव्हती. मला निवडणूकीत कोणी कोणी मदत केली हे मी सांगणार नाही परंतू राजकारणात सर्व यंत्रणा चालवावी लागते.



# चंदेरी

# प्रिया गिल अचानक कुठे गायब झाली?

**एकेकाळी बॉलिवूडची लोकप्रिय स्टार असलेली प्रिया गिल अचानक कलाक्षेत्रातून गायब झाली. एक काळ असा होता जेव्हा तिचे स्टारडम इतके होते की ते अगदी ऐश्वर्या रायलाही टक्कर देत होती. प्रिया गिल १९९९ मध्ये आलेल्या सिर्फ तुम चित्रपटात आरतीच्या भूमिकेतून रातोरात ती प्रसिद्धीझोतात आली. चित्रपटसृष्टीत ती मोठं स्थान मिळवेल असं वाटत असतानाच तिचं नशीब असं बदललं की हळूहळू ती या क्षेत्रातून गायब झाली.**



प्रिया गिल ही अतिशय सुंदर अभिनेत्री होती. १९९५ मध्ये तिने ऐश्वर्यासोबत फेमिना मिस इंडियामध्ये भाग घेतला आणि फेमिना मिस इंटरनॅशनल बनली. यानंतर तिने मिस इंटरनॅशनलमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. सौंदर्य स्पर्धा जिंकल्यानंतर तिने फिल्मी दुनियेत करिअर घडवायला सुरुवात केली. प्रिया गिलने १९९६ मध्ये तेरे मेरे सपने या चित्रपटातून डेब्यू केला होता. या चित्रपटात तिचा नायक चंद्रचूड होता. यानंतर प्रिया गिलला सिर्फ तुम या रोमँटिक चित्रपटाची ऑफर आली. या चित्रपटात तिच्यासोबत संजय कपूर मुख्य भूमिकेत होता. सिर्फ तुममध्ये सुष्मिता सेन आणि सलमान खान यांच्याही महत्त्वाच्या भूमिका होत्या. डेब्यू चित्रपटानंतर जवळपास चार वर्षांनी १९९९ मध्ये सिर्फ तुम रिलीज झाला आणि त्याने इतकी कमाई केली की प्रिया गिल सिर्फ तुम गर्ल बनली.

## साधेपणा अन् निरागसपणा...

चित्रपटातील तिचा साधेपणा आणि निरागसपणा प्रेक्षकांना आवडला. एक साधी साडी आणि दोन वेण्या घातलेली तिने साकारलेली आरती भाव खाऊन गेली. प्रिया गिलने हिंदी चित्रपटांसोबतच पंजाबी, मल्याळम, तामिळ आणि तेलगू चित्रपटांमध्ये काम केले आहे. मात्र, आजही ती सिर्फ तुमसाठी ओळखली जाते. या सुपरहिट चित्रपटानंतर प्रिया गिलने अनेक चित्रपटांमध्ये काम केले. सिर्फ तुमनंतर प्रिया गिल इतकी लोकप्रिय झाली की, जोश चित्रपटात ऐश्वर्या रायऐवजी तिला शाहरुख खानची हिरोईन बनवण्यात आले. त्याचवेळी ऐश्वर्याला शाहरुखची बहीण व्हायचे होते आणि चंद्रचूड तिचा हिरो होता. प्रिया गिलची कारकीर्द जसजशी पुढे सरकत गेली तसतशी ती डगमगायला लागली. हिंदीनंतर या अभिनेत्रीने साऊथच्या चित्रपटांमध्येही नशीब आजमावले, पण तिचे चित्रपट फ्लॉप होत राहिले. त्यानंतर त्याला मुख्य भूमिकांऐवजी साईड रोल मिळू लागला. एक काळ असा होता की सुपरस्टार प्रिया गिलला पिया तोसे नैना लागे सारख्या भोजपुरी चित्रपटात काम करावे लागले होते. एकेकाळी शाहरुख खान आणि सलमान खानसोबत काम करणाऱ्या प्रिया गिलचे करिअर अंधारात गेले. २००६ मध्ये रिलीज झालेला भैरवी हा तिचा शेवटचा चित्रपट होता. यानंतर प्रिया गिलने चित्रपट जगताचा कायमचा निरोप घेतला.



### आता १८ वर्षांनंतर प्रिया गिल कुठे आहे?

चित्रपटांपासून दूर राहण्यासोबतच प्रिया गिल सोशल मीडियावरही सक्रिय नाही. ती त्या स्टार्सच्या यादीत सामील झाली आहे, ज्यांनी फिल्मी दुनियेतील ग्लॅमर पाहून अंधार पाहिला. प्रिया गिलबद्दल असे म्हटले जाते की ती शोबिजपासून दूर डेन्मार्कमध्ये स्थायिक झाली आहे आणि तिचे वैवाहिक जीवन एन्जॉय करत आहे.

# पडद्याच्या सिनेमाचं महत्त्व कमी होणार नाही

## सुप्रसिद्ध अभिनेत्री शेफाली शाहचे मत




**सुप्रसिद्ध अभिनेत्री शेफाली शाहचे प्रोफेशनल लाईफसोबतच पर्सनल लाईफही चर्चेत असते. शेफालीने अलीकडेच दिलेल्या विशेष मुलाखतीत वेगवेगळ्या विषयांवरील प्रश्नांवर उत्तरे दिली.**

- प्रश्न : टीव्ही, सिनेमा आणि आता तुम्ही OTT मध्ये काम करत आहात. बदलत्या माध्यमांसोबत अभिनेत्रीचे आयुष्य कसे बदलले आहे?
- शेफाली : पूर्वी सिनेमात फक्त एक नायक आणि एक नायिका यावर लक्ष केंद्रित केले जायचे. इतर सर्व कलाकारांकडे दुर्लक्ष व्हायचे. फार फार तर नायकाची आई, नायकाचा मित्र हेच लक्षात राहायचे. परंतु ओटीटीच्या आगमनामुळे प्रत्येक कलाकाराला वेगळी ओळख मिळत आहे. त्याच्या कामाचे कौतुक होत आहे. यामुळेच माझ्यासारख्या अभिनेत्रीलाही काम मिळते. हे सर्व कलाकारांसाठी महत्त्वाचे आहे. कारण आमचे काम आता आंतरराष्ट्रीय स्तरावरही पाहिले जाऊ शकते.
- प्रश्न : महिला कलाकारांमध्ये काय बदल झाला आहे?
- शेफाली : आज स्त्रियांच्या दृष्टीकोनातून आणि स्त्रियांबद्दल अनेक कथा सांगितल्या जात आहेत. ज्याप्रमाणे समाजात आणि आपल्या सर्वांच्या जीवनात प्रगती होत आहे, त्याचप्रमाणे सिनेमा, टीव्ही आणि ओटीटीमध्येही विकास होत आहे. याआधीही आराधना, अभिमान किंवा आंधीसारखे अनेक चित्रपट स्त्रीकेंद्रित होते. मग एक काळ असा आला की नायिका या नायकाच्या केवळ ॲक्सेसरीज बनल्या. आता ते युग पुन्हा सुरू होत आहे, जिथे नायक-नायिकेला समान महत्त्व असते. कधीकधी ती नायकापेक्षाही महत्त्वाच्या भूमिकेत असते.
- प्रश्न : आज अशी वेळ आली आहे का जेव्हा एखादी अभिनेत्री स्वतः म्हणू शकते की ती हा प्रोजेक्ट करणार आहे की नाही?
- शेफाली : मला जे करायचे होते ते मी नेहमीच केले आहे. ही वैयक्तिक बाब आहे. मी नेहमीच निवड केली आहे. असे काही चित्रपट होते ज्यात मी असते तर मी जास्त प्रसिद्ध झाले असते. पण तो विषय माझ्या मनाला भिडला नाही म्हणून मी ते केले नाहीत. त्यामुळे ही निवड नेहमीच माझी असते आणि आज आपण त्या युगात आहोत जेव्हा आपण हे करू शकतो.



- प्रश्न : आजकाल सिनेमाला प्रेक्षक मिळत नाहीयेत. हा ओटीटीचा परिणाम असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. तुम्हाला यविषयी काय वाटते?
- शेफाली : त्याचा परिणाम होईल. कारण जेव्हा चित्रपट सिनेमागृहात प्रदर्शित होईल, तेव्हा काही लोकांना वाटते की ते काही आठवड्यांनंतर OTT वर पाहतील. पण आपल्या देशात चित्रपटगृहात जाऊन चित्रपट पाहणे ही संस्कृती आहे. संपूर्ण कुटुंबासोबत जा, समोसे खा, एकत्र हसून चित्रपटाचा आनंद घ्या, त्यामुळे हे बदलणार नाही. पण हो, OTT चा नक्कीच परिणाम होईल. असे अनेक चित्रपट आहेत जे पाहिल्यानंतर प्रेक्षक म्हणतात की हा चित्रपट मी मोठ्या पडद्यावरच पाहणार आहे. त्यामुळे हे बदलणार नाही.
- प्रश्न : तुमची मुलं तुम्हाला कधी सल्ला देतात का, की आई, तू अशी एखादी व्यक्तिरेखा किंवा कथा कर...
- शेफाली : पूर्वी मुलांना सगळ्या गोष्टी शिकवाव्या लागायच्या. आता उलटे झाले आहे. आता मुलांना हवं तसं आपल्याला वागावं लागतं. किंबहुना आपणही मुलांसोबत वाढतो. अनेक गोष्टींवर आपली वेगवेगळी मते असू शकतात पण मुलभूत मूल्ये आहेत, ती योग्य ठिकाणी आहेत. अशा बऱ्याच गोष्टी आहेत जिथे मुले म्हणतात की तू हे करू नको, हे बदल कर...
- प्रश्न : तुम्ही दिल्लीत आलात तर दिल्लीच्या कोणत्या आठवणी तुमच्याशी निगडीत आहेत? आणि दिल्ली तुम्हाला प्रेरणा देते का?
- शेफाली : दिल्लीशी संबंधित माझ्या दोन महत्त्वाच्या आठवणी आहेत. एक माझा राष्ट्रीय पुरस्कार, दुसरा दिल्ली क्राईमच्या शूटिंगचा. तो माझ्या आवडत्या शोपैकी एक आहे. तो संपूर्ण शो आम्ही दिल्लीत शूट केला. माझा एक जवळचा मित्रही दिल्लीचा आहे. मला दिल्लीत येऊन खूप मजा येते. मला फक्त दिल्लीच प्रेरणा देते असे म्हणणे योग्य ठरणार नाही. मला वाटते की इथले लोक ठिकाणांपेक्षा जास्त प्रेरणा देतात.

# पती निखिल पटेलवर दलजीत कौरचे गंभीर आरोप



**टीव्ही अभिनेत्री दलजीत कौरचे दुसरे लग्नही मोडण्याच्या मार्गावर आहे. २०१५ मध्ये शालीन भानोतपासून लग्नाच्या ८ वर्षांनी घटस्फोट घेतल्यानंतर दलजीतने २०२३ मध्ये दुसरे लग्न बिझनेसमन निखिल पटेलसोबत केले. मात्र आता तिने निखिलवर विवाहबाह्य संबंधाचे गंभीर आरोप केले आहेत. दलजीत आणि निखिलच्या वैवाहिक जीवनात सर्व काही ठीक नसल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. त्याला आता अधिक दुजोरा मिळाला आहे. दलजीतने इन्स्टाग्रामवरून लग्नाचे फोटो हटवले आहेत. आता निखिल पटेलवर आरोप केले आहेत.**

निखिल पटेलसोबत वाद सुरू असल्याच्या अफवांवर आजवर दलजीतने चुप्पी साधली होती. पण आता इन्स्टाग्रामवर सूचक पोस्ट शेअर करून 'या प्रेमाला काय नाव देऊ?' असे तिने म्हटले आहे. नात्यातील कटुता या पोस्टमध्ये स्पष्टपणे दिसून येते. एवढेच नाही तर निखिल पटेलने बेवफाई केली आहे का, त्याचे एक्स्ट्रा मॅरिटल अफेअर आहे का, अशी चर्चा सुरू झाली आहे. दलजीत कौरने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर एक पोल सुरू केला आहे आणि चाहत्यांना एक पर्याय देताना विचारले आहे की, अतिरिक्त वैवाहिक संबंधांबद्दल तुमचे मत काय आहे? यासाठी कोणाला दोष द्यायचा? मुलगी, पती किंवा पत्नी असे तीन पर्याय आहेत.

दलजीतने आणखी एक इन्स्टा स्टोरी शेअर केली आहे, जी थेट पती निखिलबद्दल आहे. या पोस्टमध्ये निखिल हा एसएन नावाच्या मुलीसाठी कमेंट करत आहे की, तुम्ही मला चांगले बनवले आहे. निखिलच्या या कमेंटवर प्रकाश टाकत दलजीतने लिहिले की, तुम्ही आता सोशल मीडियावर तिच्यासोबत रोज निर्लज्जपणे समोर येता. तुमची संपूर्ण कुटुंबाला लाज वाटू लागली आहे. दलजीतने तिच्या पतीचे पटेल आडनावही तिच्या नावासमोरून काढून टाकले आहे.

### लग्नानंतर काही महिन्यांनी वाद...

लग्नाच्या काही महिन्यांनंतरच दलजीत आणि निखिलच्या वैवाहिक जीवनात अडचणी वाढल्याचा दावा करण्यात आला होता. आपण एकमेकांसाठी योग्य नसल्याची जाणीव दोघांनाही होऊ लागली. मात्र गेल्या काही महिन्यांपासून परिस्थिती बिकट झाली आहे. दलजीत आणि निखिल यांचे १० मार्च २०२३ रोजी लग्न झाले. कुटुंबातील सदस्य आणि जवळच्या मित्रांच्या उपस्थितीत हे लग्न झाले. यापूर्वी दलजीतने २००९ मध्ये अभिनेता शालीन भानोतशी लग्न केले होते. मात्र सहा वर्षांनंतर दोघांचा घटस्फोट झाला. त्यानंतर दलजीतने शालीनवर घरगुती हिंसाचाराचे गंभीर आरोप केले होते.

## बॉर्डर २ येणार, प्रदर्शनाची तारीखही ठरली!

सनी देओलच्या 'गदर २' या चित्रपटाने मागच्या वर्षी चित्रपटगृहांमध्ये धुमाकूळ घातला होता. आता सनी देओलच्या आणखी एका जुन्या चित्रपटाचा सिक्वेल प्रेक्षकांना मोठ्या पडद्यावर पाहता येणार आहे. १९९७ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'बॉर्डर' या मल्टीस्टारर चित्रपटाचा सिक्वेल कधी येणार याबद्दल चाहत्यांच्या मनात उत्सुकता होती. २०२६ मध्ये हा चित्रपट देशभरात प्रदर्शित होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

मुख्य म्हणजे या वेळी सनी देओलसोबत आयुष्मान खुरानादेखील महत्त्वाच्या भूमिकेत असणार आहे. हा चित्रपट २३ जानेवारी २०२६ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित



होईल. चित्रपटाशी संबंधित एका सूत्राने सांगितलं की भारतीय सशस्त्र दलाच्या शौर्याचा गौरव करणारा हा चित्रपट आहे. त्यामुळे या चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी प्रजासत्ताक दिनापेक्षा चांगली वेळ असू शकत नाही असं निर्मात्यांना वाटतं आहे. त्यानुसार त्यांनी २६ जानेवारीपूर्वी २३ जानेवारीला हा चित्रपट प्रदर्शित करायचा असं ठरवलं आहे. या चित्रपटाच्या कथेवर जवळपास वर्षभरापासून काम सुरू आहे, असं म्हटलं जात आहे. 'बॉर्डर पार्ट १' सारखा ब्लॉकबस्टर चित्रपट व्हावा, या दृष्टीकोनातून चित्रपटाची स्क्रिप्ट लिहिली जात आहे. मागच्या महिन्यात या चित्रपटाच्या कथेसंदर्भात माहिती समोर आली होती. यावेळी १९७१ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यादरम्यान झालेल्या युद्धाची कथा दाखवण्यात येणार आहे. राजस्थानमधील थारच्या लोंगेवाला भारतीय चौकीवर ही लढाई झाली होती. हा आजवरचा सर्वात मोठा युद्धपट ठरणार असल्याचंही म्हटलं जात आहे. या चित्रपटाची कथा पहिल्या भागापेक्षा पूर्णपणे वेगळी असणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन अनुराग सिंह करत आहेत.

## भूल भुलैया ३ विरुद्ध सिंघम अगेन

# दिवाळीला होणार घमासान

## अजय देवगण की कार्तिक आर्यन कोण ठरणार वरचढ?

**यंदा ईदच्या दिवशी बॉक्स ऑफिसवर मोठा संघर्ष पाहायला मिळाला. अक्षय कुमारचा बडे मियाँ छोटे मियाँ आणि अजय देवगणचा मैदान एकमेकांशी भिडला होता. या स्पर्धेत दोन्ही चित्रपटांना पराभवाचा सामना करावा लागला. आता ईदनंतर दिवाळीच्या दिवशी आणखी एका मोठ्या बॉक्स ऑफिस क्लॅशबाबत अपडेट आले आहे.**




कार्तिक आर्यनचा चंदू चॅम्पियन हा चित्रपट चर्चेत आहे. हा चित्रपट काही दिवसांत प्रदर्शित होणार आहे. अशा परिस्थितीत अभिनेता प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. दरम्यान, त्याचा दुसरा मोठा चित्रपट भूल भुलैया ३ बाबत एक अपडेट आले आहे, जो चित्रपटाच्या रिलीज तारखेशी संबंधित आहे. प्रेक्षक भूल भुलैया ३ ची आतुरतेने वाट पाहत आहेत. या चित्रपटाच्या शूटिंगला या वर्षी मार्चमध्ये सुरुवात झाली होती. भूल भुलैया ३ चे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी निर्माते मेहनत घेत आहेत. बॉलीवूड हंगामाच्या रिपोर्टनुसार, भूल भुलैया ३ यावर्षी दिवाळीला रिलीज होणार आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक अनीस बज्मी आणि निर्माता भूषण कुमार यांनी आश्वासन दिले आहे की ते दिवाळीला चित्रपट आणत आहेत. मात्र, रिलीजबाबत अधिकृत घोषणा होणे बाकी आहे. कार्तिक आर्यनचा हा चित्रपट दिवाळीला रिलीज झाला तर बॉक्स ऑफिसवर मोठे घमासान युद्ध होणार आहे. कारण अजय देवगणचा सिंघम अगेन हा सिनेमाही दिवाळीला रिलीज होऊ शकतो. या चित्रपटाविषयी बातमी होती की हा स्वातंत्र्यदिनी प्रदर्शित होणार होता, परंतु पुष्पा द रुलसोबतचा संघर्ष वाचवण्यासाठी प्रदर्शनाची तारीख बदलण्यात आली. सिंघम अगेन संदर्भात बॉलीवूड हंगामामधील एका अहवालात असा दावा करण्यात आला आहे की रोहित शेट्टी आता आपला चित्रपट दिवाळीपर्यंत ढकलण्याच्या तयारीत आहे. मात्र, रिलीजची अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही. भूल भुलैया ३ आणि सिंघम अगेन हे दोन्ही चित्रपट दिवाळीला प्रदर्शित झाले तर मोठा संघर्ष होईल. कारण निर्माते दोन्ही चित्रपटांवर भरपूर पैसे गुंतवत आहेत. आता या स्पर्धेत अजय देवगण आणि कार्तिक आर्यन यांच्यातील कोणाचा चित्रपट बाजी मारणार आणि कोणता चित्रपट बॉक्स ऑफिसवर जिंकणार हे पाहणे रोमांचक ठरणार आहे.

पारनेर दर्शन
मंगळवार ११ जुन २०२४


## शॉर्ट न्यूज

### घडणारी शाळा या पुस्तकाचे प्रकाशन

■ **अकोले :** जगातील महत्त्वाच्या प्रगत भाषांमध्ये मराठी ही भाषा असून ती ज्ञान-विज्ञानाची भाषा बनवण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांनी केले. अकोलेतील अगस्ती महाविद्यालयाच्या के. बी. दादा देशमुख सभागृहात प्रयोगशील शिक्षक भाऊसाहेब कासार लिखित घडणारी शाळा या पुस्तक प्रकाशन समारंभात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संगमनेर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. के. के. देशमुख होते. यावेळी गटशिक्षणाधिकारी अभयकुमार वाव्हळ आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

### धूमस्टाईलने सोनसाखळी लांबवली

■ **संगमनेर :** रात्री साडेसात वाजेच्या सुमारास जुन्या पुणे-नाशिक महामार्गालगत असलेल्या कुंथुनाथ सोसायटी रस्त्याने जैन मंदिराकडे जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील तीन तोळे वजनाची सोन्याची साखळी दोन अज्ञात चोरट्यांनी लांबवली. रात्री सुनीता मेहता जैन मंदिराकडे जात होत्या. त्याचवेळी दुचाकीवरून आलेल्या अज्ञात दोन चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील तीन तोळे वजनाची सोन्याची साखळी ओरबाडून पलायन केले. याप्रकरणी मेहता यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### राम शिंदे यांची सरकारकडे मागणी

■ **जामखेड :** कृष्णा भिमा स्थिरीकरण योजनेत जामखेड तालुक्याचा समावेश व्हावा यासाठी आमदार प्रा. राम शिंदे यांनी राज्य सरकारकडे पाठपुरावा हाती घेतला आहे. याबाबत आमदार शिंदे यांनी उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून मागणी केली आहे. त्यानंतर जलसंपदा विभागाने कृष्णा खोरे विकास महामंडळाकडून याबाबतचा अहवाल मागवला आहे. आमदार शिंदे यांनी केलेल्या महत्वपूर्ण मागणीमुळे जामखेड तालुक्यातील जनतेच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

### श्री शनैश्वर १०८ कुंडीय महायज्ञ उत्साहात

■ **शनिशिंगणापूर :** येथे शनीजयंतीनिमित्त १०८ कुंडीय श्री शनैश्वर महायज्ञ मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. स्वामीजींच्या व माताजींच्या हस्ते सर्व आचार्य व ब्रह्मवृंदांचे स्वागत केले. यज्ञाचे मुख्य आचार्य श्रीराम शास्त्री मुळे व अन्य दहा तसेच गुजरात येथील आचार्य कश्यपभाई जनी व अनिलशास्त्री जोशी यांनी यज्ञ संकल्प, देहशुद्धी, प्रायश्चित्त, हेमाद्री, पुण्याहवाचन, गणेश पूजन, यासह सर्व देवता मंडल, पीठ आवाहन, प्रतिष्ठापना व पूजन केले. यावेळी देवगड संस्थांचे गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांनी भेट दिली.

### निकालानंतर कांद्याने घेतली उसळी

■ **श्रीरामपूर :** येथील बाजार समितीत यंदा प्रथमच कांद्याला उच्चांकी ३ हजार क्विंटल दर मिळाला. विशेष म्हणजे मोकळ्या कांद्याचे बाजारभाव २७५० रुपये प्रतिक्विंटलवर पोहोचले. जून महिन्याच्या प्रारंभी कांद्याने एवढा भाव खाल्ल्याची ही पहिलीच घटना आहे. श्रीरामपुरात १२० वाहनांतून मोकळा कांदा बाजारात दाखल झाला, तसेच १७ हजार २६० गोण्यांची मोठी आवक झाली. गोणीतील कांद्याला ३१०० रुपये क्विंटल दर मिळाल्याची माहिती सभापती सुधीर नवले यांनी दिली.

# स्व. शेळके यांनी आर्थिक विकासाला गती दिली

## गुलाबराव शेळके यांच्या जयंतीदिनी अभिवादन



■ जी एस महानगर बँकेचे संस्थापक स्व. गुलाबराव शेळके यांच्या जयंतीदिनी त्यांना अभिवादन करण्यात आले.

**पिंपरी जलसेन : प्रतिनिधी**

**स्व. सॉ. गुलाबराव शेळके यांनी गेल्या ५० वर्षात मुंबानगरीमध्ये पारनेरकरांना आर्थिक पाठबळ देऊन जिल्हयाच्या आर्थिक विकासाला गती दिल्याचे प्रतिपादन मळगंगा देवस्थान ट्रस्टचे मा. अध्यक्ष प्रभाकरशेठ कवाद यांनी केले.**

रविवार दि. ९ जुन रोजी पिंपरी जलसेन येथे स्व. गुलाबराव शेळके यांच्या जयंतीदिनी त्यांच्या स्मृतीस्थळी अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा सहकारी बँक तसेच जीएस महानगर बँकेच्या संचालिका गितांजली शेळके यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कवाद म्हणाले, स्व. शेळके यांनी त्या काळात अहमदनगर सहकारी बँकेचे स्थापना करून सर्वसामान्य जनतेला आर्थिक स्थैर्य प्राप्त करून दिले. सहकारी चळवळीच्या माध्यमातून औद्योगिकरणासाठी कर्जपुरवठा करीत राज्याच्या औद्योगिक विकासालाही हातभार लावण्यात स्व. शेळके यांनी पुढाकार घेतला. जास्तीत जास्त सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे श्रेयही शेळके यांना जाते. सहकारी चळवळ तसेच बँकेच्या माध्यमातून पारनेर तालुक्याचा लौकीक राज्यभर त्यांनी वाढविला असल्याचे कवाद म्हणाले.

संचालिका गितांजली शेळके, प्रभाकर कवाद, पत्रकार दत्ताजी उनवणे, सरपंच, उपसरपंच, मा. सरपंच तसेच ग्रामस्थांच्या वतीने यावेळी शेळके यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी मा. सरपंच लहू थोरात, सरपंच सुरेश काळे, बँक संघटनेचे संघटक नीलेश खानविलकर, तालुका विकास अधिकारी प्रभाकर लाळगे, विठ्ठल अडसरे, निळकंठ सोनवणे, पत्रकार दत्ताजी उनवणे, महानगर बँकेचे अधिकारी राहुल शेळके, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# सुपा परिसरात सलग दोन दिवस जोरदार पाऊस

## ■ पेरणीयोग्य पावसाने बळीराजा सुखावला ■ पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार



■ सुपा येथे रविवारी सायंकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली.(छाया - शरद रसाळ, सुपा)

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील बहुतेक ठिकाणी जिरायती पट्टयात रविवार दि. ९ रोजी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने बळीराजा सुखावला आहे. रोहिणी नक्षत्र कोरडे गेल्यानंतर प्रथमच पावसाने हजेरी लावल्याने खरीप हंगामातील पेरणीला आता वेग येणार आहे. तर सलग दुसऱ्या दिवशी झालेल्या जोरदार पावसाने पाण्याचा प्रश्न काही अंशी निकाली निघणार आहे.**

गेल्या वर्षी एकामागून एक नक्षत्र कोरडे गेल्यानंतर ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. शनिवार पासून सुरू झालेल्या पावसाचा जोर रविवारी कायम राहील्याने सुपा, वाळवणे, रूईछत्रपती, वाघुंडे, हंगा, शहांजापूर, रायतळे, आपधूप, मुंगाशी, पळवे, जातेगाव, बाबुर्डी, भोयरे गांगर्डा, कडूस, नारायणगव्हाण, वाडेगव्हाण परिसर पावसाने झोडपून काढल्याने परिसरातील नाले, बंधारे, केटीवेअर भरुन वाहू लागल्याने जिकडे - तिकडे पाणीच पाणी झाले होते. उशिरा पण वेळेत वरुणराजाने कृपादृष्टी दाखवल्याने सर्वत्र समाधानाचे वातावरण आहे.

रूईछत्रपती येथील टेंभीचा तलावात पाणी आल्याने तलावालगत असणाऱ्या विहीरी भरल्यानंतर रूईछत्रपती, बाबुर्डी, वाळवणे, गणेशवाडी, पिंप्री गवळी आदी गावांची भारत निर्माण पाणी पुरवठा योजना पुन्हा कार्यान्वित होणार आहे. तर शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी केलेल्या खरीप हंगामातील मुग, बाजरी, वाटाणा, तुर, जनावरांसाठी मका, कडवळ आदींची पेरणी होणार आहे.

शनिवारी मध्यरात्री वादळी वाऱ्यासह या भागात पाऊस झाला. तर काही शेतकऱ्यांचे घरांवरील पत्रे उडाल्याने संसार उघड्यावर आला. वादळात मोठ मोठी झाडे उन्मळून पडली. काही शेतकऱ्यांचा कांदा भिजल्याने काद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. रविवारी सायंकाळी ६ ते ८ पावसाने जोरदार हजेरी लावली तर रात्रभर पावसाची रिमझिम सुरू होती. मुसळधार झालेल्या पावसाचे शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

# आचारसंहिता संपताच मनपाच्या भरती प्रक्रियेला वेग

**नगर : प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपताच महापालिकेच्या रखडलेल्या कर्मचारी भरती प्रक्रियेला वेग आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस मार्फत ही प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्यामुळे कर्मचारी भरती संदर्भातील प्रक्रिया लवकरच सुरू होण्याची संकेत आहेत.**



महापालिकेतील मंजूर असलेल्या दोन हजार ८७१ पदांपैकी दीड हजारांहून अधिक पदे रिक्त आहेत. जून महिन्यात आणखी काही कर्मचारी निवृत्त होणार आहेत. तांत्रिक कर्मचार्यांची कमतरता असल्यामुळे कामकाजात अडथळे येत आहेत. त्यामुळे महापालिकेने राज्य शासनाकडे कर्मचारी भरतीबाबत प्रस्ताव पाठवला होता. राज्य शासनाने महापालिकेतील रिक्त पदांपैकी १३४ तांत्रिक पदे भरण्यासाठी मान्यता दिलेली आहे. याबाबतची सर्व माहिती महापालिकेकडून टाटा कन्सल्टन्सीला देण्यात आलेली आहे. येत्या महिनाभरात महापालिकेतील तांत्रिक कर्मचारी भरतीची प्रक्रिया सुरू होण्याची चिन्हे आहेत.

# मोदींच्या तिसऱ्या टर्मची वाटचाल विश्वामध्ये गौरवशाली ठरेल !

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटलांचा विश्वास



**नगर : प्रतिनिधी**

**विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा शपथ घेतल्याचा मनस्वी आनंद देशवासियांना आहे. आत्मनिर्भर भारत आता विकसित करण्याच्या दृष्टीने त्यांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेली तिसऱ्या टर्मची वाटचाल ही संपूर्ण विश्वामध्ये गौरवशाली ठरेल असा विश्वास महसूल तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नवनिर्वाचित मंत्र्यांच्या शपथ विधी सोहळ्यास मंत्री विखे पाटील यांनी उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा दिल्या. बहुतेक गावांमध्ये भर पावसातही भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी फटाक्यांची अतिषबाजी करून या ऐतिहासिक क्षणाचा आनंद द्विगुणीत केला. सलग तिसऱ्या वेळी पंतप्रधानपदी विराजमान होत असलेल्या मोदीजींनी दहा वर्षांच्या कारकिर्दीत देशाची प्रतिमा सर्वच पातळ्यावर उंचावली. लोककल्याणाच्या अनेक योजना तळागाळात पोहोचविल्या. नुकत्याच संपन्न झालेल्या लोकसभा निवडणूकीत पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा भाजपा आणि एनडीएचे सरकार स्थापन होवून हॅट्रीक साधली गेली असल्याचे त्यांनी सांगितले.

आयोध्येतील श्रीराम मंदिर, ३७० कलम या निर्णयातून राष्ट्रीयत्वाची आणि देशाच्या ऐक्याची निर्णयप्रक्रिया राबवितानाच विकसित भारतासाठी वंदे भारत एक्सप्रेस, डिजीटल पेमेंटची सुविधा या बरोबरीनेच देशातील महिला, शेतकरी, युवावर्ग या सर्वांनाच केंद्रीभूत मानून पंतप्रधान मोदींनी सुरु केलेल्या योजना या सातत्याने लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्या. येणाऱ्या काळात देशाची आर्थिक महासत्ता ५ ट्रीलियन डॉलर्स करण्याचे त्यांचे स्वप्न या तिसऱ्या टर्ममध्ये निश्चित पुर्ण होईल असा विश्वास व्यक्त करतानाच भारत देश आता महासत्तेच्या दिशेने करीत असलेली वाटचाल लक्षात घेता पंतप्रधान मोदीजींच्या कर्तृत्वाची रेषा मोठी होत असल्याचा अभिमान पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि देशवासियांना असल्याची भावना मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केली.

SACCHIDANAND CAREER INSTITUTE
Parner Public School
G.M INTERNATIONAL SCHOOL PARNER
ADMISSIONS OPEN 2024-25
प्रवेश सुरू २०२४-२५
PARNER PUBLIC SCHOOL
LKG, UKG, STD 1st
State Board
11th Science (State Board & NCERT Syllabus)
Integrated with NEET & MHT-CET
MHT-CET (Engg., NATA, Architecture, NDA, Other Entrance)
NEET (Medical, Agri, Pharmacy, Other Entrance)
G. M. INTERNATIONAL SCHOOL
LKG, UKG, STD 1st to 5th
CBSE Board

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2

डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
नोंदणी क्र. महा. ३९६/२२
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच

मेजर भगवान नांगरे सर
* आमची वैशिष्ट्ये *
* १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
* एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
* प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
* मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
* अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
* PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
* पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
* ॲडमिशन ओपन *
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# कै.गंगाराम शिंदे : शून्यातून विश्व निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व

**गीतरामायणकार कवी ग.दि.माडगुळकर म्हणतात, दैवजात दु:खे भरता दोष ना कुणाचा, पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा ! कै. गंगाराम शिंदे यांच्या बाबतही अगदी तसेच घडले. अत्यंत सामान्य कुटूंबात जन्म घेवून प्रतिकुल परिस्थितीवर मात करीत शुन्यातून विश्व निर्माण केले. कुटूंबवत्सल व्यक्तिमत्व अशीच त्यांची ओळख. मात्र घरात गोकुळ नांदत असतानाच त्यांना मध्यमवयातच जगाचा निरोप घ्यावा लागला.**



**पारनेर तालुक्यातील माळकूप गावामध्ये कै.बबन कान्हू शिंदे यांच्या शेतकरी कुटुंबामध्ये १ जून १९५७ रोजी गंगाराम बबन शिंदे यांचा जन्म झाला. गरीब, शेतकरी एकत्रित कुटुंब, चार मावळणी एक चुलते असा मोठा परिवार. त्यातही गंगाराम आणि चुलते मंजाबापू बरोबरीचेच. एकाच वर्गात जुनी मॅट्रीक म्हणजेच जुनी अकरावी पर्यंतचे शिक्षण भाळवणी या ठिकाणी पूर्ण केले. त्यानंतर शासकिय आय. टी. आय अहमदनगर येथे दोन वर्षाचा फिटर ट्रेड अत्यंत चांगल्या गुणांनी पूर्ण करून उत्तीर्ण झाले. अडवाणी ऑर्लिकन कंपनी लि. पुणे येथे एक वर्षाची अप्रेंटिस पूर्ण करून काही दिवस बजाज टेम्पो लि. आकुर्डी पुणे येथे नोकरी केली. दरम्यान अहमदनगर एमआयडीसीमध्ये सहयाद्री इंजिनिअरिंग या मोठ्या कंपनीमध्ये त्यांची नियुक्ती झाली.**

कुटुंबातील गंगाराम हे सर्वात मोठे, नोकरी करणारे असल्यामुळे वडीलांसोबत संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर आली. पुढे चार बहिणींची लग्न, मावाचे शिक्षण, कुटुंबाला मदतीचा हात देण्यात अनेक वर्षे गेली. दि. २१ मे १९८१ रोजी त्यांचा विवाह हिंगणगाव ता. नगर स्थित कै. दगडू कोंडाजी सिनारे यांची कन्या शकुंतला यांच्याशी झाला. त्यानंतर किशोर व सचिन हे दोन मुले जन्माला आली.त्यांना उत्तम इंजिनिअरींगचे शिक्षण देण्यासाठी त्यांनी अपार मेहनत घेतली. दरम्यान ते ज्या सहयाद्री कंपनीमध्ये नोकरी करीत होते ती संपामुळे बंद झाली. कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न मिळता हातातील नोकरी गेल्यामुळे काही दिवस अत्यंत हलाखीमध्ये आयुष्य काढावे लागले.तशा परिस्थितीमध्ये रोजंदारीवर कामाला जाऊन कुटुंबाची गुजरान केली.वेळ प्रसंगी पोटाला चिमटा घेतला परंतू मुलांच्या शिक्षणासाठी पैसा उपलब्ध केला.

-शब्दांकन-
**रावसाहेब शिंदे (सर)**

पुढे जाऊन त्यांनी नगर एमआयडीसीमध्ये फॅब्रीकेशनची कामे लेबर कॉंट्रक्ट बेसीसवर करण्यास सुरुवात केली. त्या कामामध्ये अपार कष्ट करुन कुटुंबासाठी अर्थार्जन केले. त्यामधुनच त्यांनी बोल्हेगाव फाटा येथे २ सुंठे जागा घेऊन अलिशान बंगला बांधला. आता मुलांचे शिक्षण पूर्ण होऊन ते नोकरीला लागली होती. दोन्ही मुलांची लग्न झाली. नातवंडे झाली, घराचे गोकुळ झाले. संपूर्ण कुटूंब सुखात आणि समाधानात होते. आयुष्यभर अपार कष्ट करून हे सुखाचे दिवस पहायला मिळाले होते. त्यामुळे संपूर्ण परिवार आनंदी होता.

अशा परिस्थितीत दोन्ही मुले त्यांना म्हणाली, ''पप्पा, आता तुम्ही दुसन्यांकडे कामाला जायचे नाही. परंतू मोकळे बसणे त्यांच्या स्वभावात नव्हते. आपण काहीतरी उद्योग, व्यवसाय सुरु करावा असा विचार त्यांच्या मनात आला. त्यातुनच ढवळपुरी फाटा येथे मोठे पोल्ट्री फार्म सुरु केले. त्याच्या उभारणीसाठी रात्रंदिवस मेहनत घेतली. पोल्ट्री फार्म अत्यंत व्यवस्थित सुरु झाले.आता फक्त देखदेख करायची, जास्त धावपळ करायची नाही असे ठरवले देखील. पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. एके दिवशी संध्याकाळी ७ वाजता माळकुपवरून बोल्हेगावला जात असताना निंबळक परीसरात एका मोटार सायकलचा धक्का लागुन ते डांबरी रस्त्यावर जोरात आदळले. डोक्याला खुप मार लागला. एका ओळखीच्या माणसाने कॉलनीतील काही मित्रांना फोन केला व त्यांना ताबडतोप नोबेल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. उपचार सुरु असताना एके दिवशी संपुर्ण शरीराचे स्कॅन करताना डॉक्टरांच्या लक्षात आले की किडनीमध्ये गाठ आहे.डॉक्टरांनी आम्हास कल्पना दिली. पण डोक्याची जखम भरून पूर्ण इलाज झाल्याशिवाय त्यावर उपचार करता येत नाहीत असे सांगितले.

या आजारामधुन सावरल्या बरोबर लगेचच पुणे येथे उपचारास सुरुवात झाली.मागील सात ते आठ वर्ष दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात सर्व संभव असे उपचार करण्यात आले. शेवटी उपचाराला शरीर साथ देत नाही असे डॉक्टरांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी पेशंट घरी घेऊन जाण्याचा सल्ला दिला. आम्ही प्रयत्नांची पराकष्टा केली परंतु त्यांचे सरीर साथ देत नव्हते. शेवटी रविवार दि. २ जुन २०२४ रोजी सकाळी ठीक ७.५० वा. त्यांनी अखेरचा श्वास घेतला आणि संपूर्ण परिवारावर शोककळा पसरली. शेवटी ईश्वरी सत्तेपुढे विलाज नाही.अशा या **आदर्श कुटूंबप्रमुखास भावपूर्ण श्रद्धांजली.**

## सांप्रदायिक वारसा

**वडील कै.बबनराव शिंदे आणि आई कै. ठकुबाई यांनी ह. भ. प. रजिंद्र महाराज झांबरे यांना गुरु केले आणि त्यांच्यासोबत आळंदी ते पंढरपुर दहा वर्ष माऊली ज्ञानेश्वर महाराज दिंडी सोबत पायी वारी केली. त्यानंतर कै. गंगाराम यांनी देखील झांबरे महाराजांना आपले गुरु मानले. त्यांच्यासोबतच १२ वर्षे पायी वारी केली. दिंडीमध्ये सोबत सर्व बहीणी, नातेवाईक यांना घेऊन जात असे. प्रकृती साथ देत नसतानाही माऊलींच्या पालखी सोहळ्याच्या प्रस्थानासाठी आवर्जुन सहभागी होत. दिंडी पंढरपुरला पोहोचली की पंढरपुर नगरीत पुन्हा वारीमध्ये सहभागी होत असत.**



■ कै. गंगाराम शिंदे यांचा परिवार म्हणजे जणू सोन्याचा संसारच होता.

## मोठा परिवार

**कै. गंगाराम हे कुटुंबातील सर्वात जेष्ठ. त्यानंतर श्रीमती ताराबाई गोविंद चेमटे, सौ.संजिवनी सुधाकर डोंगरे,सौ. मंदाकिनी बाबासाहेब डोंगरे व कै. लहानुबाई संभाजी नरसाळे या चार भगिनी, श्री रावसाहेब व श्री.बाळासाहेव बबन शिंदे हे भाऊ, मंजाबापू शिंदे (चुलते), संदिप मंजाबापू शिंदे (भाऊ), पत्नी शकुंतला, दोन मुले किशोर आणि सचिन,सुना सुजाता व अपर्णा, पुतणे संकेत,विजय,हर्षल,निखिल,पुतण्या ज्योती, स्वाती, सारीका, दीक्षा, भाचे संतोष व राजेंद्र गोविंद चेमटे, रविंद्र व अनिल डोंगरे, संदिप डोंगरे, राहुल नरमाळे, भाच्या शारदा रोहोकले, सुरेखा आबूज, आशा कुलट, सविता सिनारे, मिरा शिंदे, सुरेखा सुंबे, अनेक नातवंडे व परतवंडे असा खुप मोठा परिवार आहे.**

# विखेंविरोधात निवडणूक जिंकणे सोपे नाही!

## नीलेश लंके यांच्या विजयानंतर शरद पवार यांची प्रतिक्रिया



■ लोकसभा निवडणूकीतील विजयानंतर खा. नीलेश लंके यांनी मुंबईत शरद पवार यांची भेट घेतली.

**मुंबई : प्रतिनिधी**

**विखेंविरोधात निवडणूक जिंकणे सोपे नाही, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शरद पवार यांनी दिली.**

लोकसभा निवडणूकीत विजय संपादन केल्यानंतर नीलेश लंके यांनी शनिवारी मुंबईत शरद पवार यांची भेट घेऊन त्यांचे आशिर्वाद घेतले. या भेटीप्रसंगी पवार यांनी लंके यांनी दिलेल्या लढतीचे कौतुक करीत विखेंविरोधात निवडणूक जिंकणे सोपे नाही अशी प्रतिक्रिया दिली. त्यावर साहेब मी तुमच्यामुळे खासदार झालो असे सांगत तुमचा व माझा आत्मविश्वास सारखाच होता. तुम्ही मला दोन-अडीच वर्षांपासून सांगत होते की तु निश्चित ही निवडणूक जिंकशील. आपण पराभूत होऊ असा एकही नकारात्मक मुद्दानिवडणूकीत नव्हता असे लंके यावेळी म्हणाले. माझ्या राजकीय जीवनात पवार साहेबांनी महत्वाची भूमिका बजावल्याची पुस्ती लंके यांनी यावेळी जोडली.

नीलेश लंके यांनी निवडणूकीचा अर्ज दाखल केल्यानंतर पवार यांचे निवडणूकीतील प्रत्येक हालचालींवर लक्ष होते. ते स्थानिक पातळीवरील आढावा दररोज घेत होते. त्यानंतर पवारांकडून लंके यांना दररोज सुचना देण्यात येत होत्या. महाविकास आघाडीतील घटक पक्षांच्या समन्वयातून लंके यांनी या निवडणूकीत बाजी मारली. लंके यांच्या या विजयाचा विशेष आनंद झाल्याचे पवारांनी यावेळी आवर्जुन सांगितले. एका बलाढय उमेदवाराविरोधात नीलेश लंके यांच्यासारख्या सामान्य घरातील, शेतकरी, प्राथमिक शिक्षकाच्या सामान्य उमेदवाराने मिळविलेला विजय हा आनंददायी आहे असेही पवार म्हणाले. लंके यांच्या भेटीप्रसंगी अशोक घुले, नितिन चिकणे, ओंकार गारुडकर, योगेश शिंदे यांच्यासह लंके यांचे सहकारी उपस्थित होते.

# पराभवाने खचून जाऊ नका !

## मा. खा. डॉ. सुजय विखे यांचे आवाहन विखे यांचा महायुती कार्यकर्त्यांशी संवाद



**नगर : प्रतिनिधी**

**माझ्या निवडणूकीसाठी प्रत्येक कार्यकर्ता रात्रीचा दिवस करून पळाला आहे. आपला पराभव झाला असला तरी खचून जाऊ नका. आरोप-प्रत्यारोपांमध्ये वेळ घालविण्यापेक्षा गावपातळीवर आजपासून कामाला सुरूवात करा. जिथे अन्याय होईल तिथे तुमच्या पाठीशी खंबीरपणे मी उभा आहे. महायुतीची ताकद विधानसभा निवडणूकीत दाखवून देण्यासाठी कटीबद्ध व्हा असे आवाहन मा. खा. डॉ. सुजय विखे यांनी केले.**

लोकसभा निवडणूकीच्या निकालानंतर डॉ. सुजय विखे यांनी महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी रविवारी संवाद साधत कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्याशी त्यांनी संवाद साधला. जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डीले, मा. महापौर बाबासाहेब वाकळे यांच्यासह लोकसभा मतदारसंघातील असंख्य कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

डॉ. विखे म्हणाले, निवडणूक निकालाच्या विश्लेषणात न जाता आता पुन्हा नव्याने आपल्याला पुन्हा नव्याने आपल्याला काम सुरू करायचे आहे. त्यामुळे पराभवाने नाराज होऊ नका. पराभव का झाला याची कारणे फार वेगळी आहेत. तरीही सहा लाखांचे मतदान देऊन जनतेने आपल्याला विश्वास दाखविला. यासाठी जे कार्यकर्ते पळाले त्यांच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा आहे. आम्ही पराभव स्विकारला पण समोरच्यांना विजय पचवता येत नाही. पारनेरची घटना पाहता आता यापुढे कोणत्याही कार्यकर्त्यांवर हल्ला झाल्यास महायुतीच्या कार्यकर्त्यांनी बांगडया भरलेल्या नाहीत अशा शब्दात त्यांनी विरोधकांचा समाचार घेतला. लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक गावात आपण निधी दिला आहे. विकास कामे पुर्ण कशी होतील याचा पाठपुरावा करा. यासाठी थेट संपर्क साधा. केंद्रात आणि राज्यात महायुतीचे सरकार आहे. विकास कामांना मोठी मदत होणार आहे. नगरच्या औद्योगिक वसाहतीचे काम महिनाभरात सुरू होईल जी आश्वासने दिली त्याची पुर्तता करण्यासाठी आपण कटीबध्द राहणार असून कुठेही कमी पडणार नाही. कोणी काही चर्चा केल्या तरी २०२९ चा खासदार महायुतीचाच असेल आणि येणाऱ्या विधानसभा निवडणूकीत महायुतीची ताकद विरोधकांना दाखवून देण्याचे आवाहन विखे यांनी केले.




'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com